

कारशेडच्या मुद्यावरून चर्चेत असणाऱ्या मुंबई मेट्रो-३ चे काम वेगाने पूर्ण होत आहे. या मेट्रो मार्गिकेसाठी ८ डब्यांची दुसरी ट्रेन आंध्र प्रदेशातील श्री सिटी येथून गुरुवारी मुंबईत दाखल झाली. आरे कॉलनीतील सारिपूतनगर येथे उभारण्यात आलेल्या चाचणी ट्रॅकवर या ट्रेनचे आठही डबे गुरुवारी उतरवण्यात आले.